# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १०४/२०२०

**विषय : अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षांचे आयोजन करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे व सूचना.**

कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन करण्यात येत आहे. याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१. परीक्षा विभागाचे पत्र क्र.परीक्षा/४१५, दिनांक १ जून, २०२० च्या अनुषंगाने बहुतांश महाविद्यालये/संस्थांनी त्यांच्या महाविद्यालये/संस्थांतील अंतिम सत्र/अंतिम वर्षातील प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प/चर्चासत्र (Seminar) परीक्षांची गुणनोंदणी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोंदविली आहे, मात्र ज्या अभ्यासक्रमांचे प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प/चर्चासत्र (Seminar) परीक्षा निर्धारित पध्दतीने घेतल्या गेलेल्या नाहीत अथवा झालेल्या नाहीत, त्या सर्व परीक्षांचे आयोजन दिनांक १५ सप्टेंबर, २०२० ते दिनांक २५ सप्टेंबर, २०२० दरम्यान Online पध्दतीने उपलब्ध असलेल्या Google Meet, Microsoft Team, Zoom, WebEx, Telephone इत्यादी विविध पध्दतीने आयोजित करण्यात यावेत व सदर परीक्षा या अभ्यासक्रमाच्या आराखडयामधील संपूर्ण गुणांवर आधारीत असाव्यात व त्या संपूर्ण गुणांसाठी विद्यार्थ्यांना गुणदान करण्यात यावे. यामध्ये कोणत्याही स्वरुपाचे रुपांतर करण्यात येऊ नये. त्यासंबंधीचे संपूर्ण रेकॉर्डीग महाविद्यालयांमध्ये जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. सदर परीक्षा संपन्न झाल्यानंतर विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुरक्षित अंतर्गत गुण नोंदणी (Internal Marks Web Portal) या लिंकव्दारे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२० पूर्वी करण्यात यावी.

२. अंतिम सत्रामधील/अंतिम वर्षामधील विद्यार्थ्यांच्या अनुशेषित विषयांच्या (Backlog Subjects) परीक्षांचे नियोजन दिनांक १ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० दरम्यान होतील. तसेच नियमित (Regular) परीक्षा दिनांक १० ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ३० ऑक्टोबर, २०२० दरम्यान होतील. या परीक्षा Online/offline बहुपर्यायी प्रश्नाव्दारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने घेण्यात येतील. Online व Offline या दोन्ही पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपाच्या परीक्षा या ५० गुणांच्या ६० मिनिटे (एक तास) कालावधीच्या राहतील. यासाठी दिलेल्या ६० बहुपर्यायी प्रश्नांपैकी (MCQ)५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राहय धरण्यात येतील. या परीक्षेमध्ये ४० टक्के सोपे, ४० टक्के मध्यम व २० टक्के कठीण या काठिण्यपातळीचे प्रश्न असतील.

३. सदर परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

४. अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील परीक्षांसाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठाने Online पध्दतीने परीक्षा देणेची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. तथापि offline पध्दतीनेही विद्यार्थ्यांना परीक्षा देता येईल. याबाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या लॉगिन आयडीवरुन विकल्प अर्ज (Option Form) उपलब्ध करुन देण्यात आले होते व त्याप्रमाणे परीक्षांची सुविधा विद्यार्थ्यांच्या लॉगीन आयडी मधून उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर बाबतीत विद्यार्थ्यांना एसएमएस व ई-मेलव्दारे अवगत करण्यात येईल. मात्र यासाठी विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक कार्यान्वित असणे आवश्यक आहे.

५. जे विद्यार्थी offline चा पर्याय निवडतील त्यांच्यासाठी OMR Sheet चा वापर करुन offline पध्दतीच्या परीक्षांचे आयोजन हे महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, आरोग्य मंत्रालय यांनी कोव्हिड-१९ बाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सुरक्षित अंतर ठेवून, विद्यार्थ्यांची सुरक्षा व परीक्षांचे पावित्र्य राखून महाविद्यालये/संस्थांमध्ये घेण्यात येतील. यासाठीचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. त्याकरिता यापूर्वी वितरीत करण्यात आलेले

प्रवेशपत्र (Hall Ticket) ग्राहय राहील. तसेच विद्यार्थ्यांना विद्यापीठाशी संलग्नित नजीकचे महाविद्यालय अथवा स्वतःचे महाविद्यालय हे परीक्षा केंद्र म्हणून निवडता येईल.

६. कोणत्याही कारणास्तव जे विद्यार्थी अंतिम सत्र/अंतिम वर्षाची नियमित (Regular) अथवा अनुशेषित (Backlog) विषयांची परीक्षा देवू शकणार नाहीत, त्यांची परीक्षा व वेळापत्रक परीक्षा विभागाकडून नंतर जाहीर करण्यात येईल.

७. Online परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला सॉफ्टवेअरमार्फत आपोआप वाढवून दिला जाईल. यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही आपोआप सेव्ह होऊन खंड पडल्यास तेथून परीक्षा पुन्हा सुरु होईल.

८. Online परीक्षेची संपूर्ण माहिती होण्यासाठी अंतिम परीक्षेमधील नमूना प्रश्नांवर आधारीत सराव परीक्षांचे आयोजन (Mock Test/Practice Test) मुख्य परीक्षेपूर्वी दोन वेळा करण्यात येईल.

९. दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील. तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी २० मिनिटे अधिकचा वेळ देय राहील. सदर विद्यार्थ्यांना महाविद्यालये/संस्थाचे प्राचार्य/संचालक यांच्या पूर्वपरवानगीने लेखनिक/सहायक घेता येईल.

१०. अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या नियमित (Regular), पुनःपरीक्षार्थी (Repeater) व अनुशेषित (Backlog) विद्यार्थ्यांच्या समसत्राच्या परीक्षा दिनांक १३ मार्च, २०२० पर्यंत पूर्ण झालेल्या अभ्यासक्रमावर होतील. अंतिम पूर्व वर्षाच्या/सत्राच्या पुनःपरीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांच्या परीक्षा या संपूर्ण १०० टक्के अभ्यासक्रमावर होतील. या परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपात आयोजित करण्यात येतील.

११. Online व Offline या दोन्ही पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.

१२. सदर परीक्षांच्या आयोजनापूर्वी येणा-या अडचणी व शंकांचे निराकरण करण्यासाठी covid19helpdesk@pun.unipune.ac.in या मेल आयडीवर स्क्रीनशॉटसह ई-मेल करण्यात यावा. तसेच प्रत्यक्ष परीक्षेदरम्यान येणा-या अडचणींचे निवारण करण्याकरिता जिल्हास्तरीय अभ्यासक्रमनिहाय समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली असून त्याचा तपशील स्वतंत्रपणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

मा.प्राचार्य/संचालक यांना विनंती करण्यात येते की, वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा-समन्वय/३६५
दिनांक : १५ सप्टेंबर, २०२०

प्रति,

१. मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/स्वायत्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा

प्रत माहितीसाठी :

१. मा.कुलगुरु यांचे कार्यालय
२. मा.प्र-कुलगुरु यांचे कार्यालय
३. मा.अधिष्ठाते, सर्व विद्याशाखा